**आर्थिक वर्षाच्या अखेरीस खरेदीच्या प्रस्तावांबाबत करावयाची कार्यवाही**

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
**अर्थ प्रशासन विभाग**
**पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)**

जा.क्र.अप्रवि/वर्षा.अखेर.खरेदी/2963/२०२४ दिनांकः १४/०२/२०२४

**वाचा :** शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. संकीण-२०२४/प्र.क्र.१०/२४/कोषा.प्रशा.५, दि.१४ फेब्रुवारी, २०२४.

# परिपत्रक

विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी/ विभागप्रमुख / कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, चालू आर्थिक वर्ष **२०२३-२४** या वर्षाच्या अखेरीस खरेदीच्या प्रस्तावाबाबत करावयाच्या कार्यवाहीचे संदर्भीय शासन परिपत्रक काढण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी/ विभागप्रमुख / कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर शासन परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करुन त्यानुसार चालू वर्ष सन **२०२३-२४** मध्ये खरेदी विषयक कार्यवाही करण्यात यावी.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

**सोबत :** संदर्भीय शासन परिपत्रक.

**प्रत :** १) सर्व आहरण व संवितरण अधिकारी, डॉ.पं दे.कृ.वि., अकोला यांना कार्यवाहीस्तव
२) कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांना माहितीस्तव.
३) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला / नागपूर.
४) कुलगुरु यांचे स्वीय सहायक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना मा.कुलगुरु यांच्या माहितीकरीता.
५) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष,डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

आर्थिक वर्षाच्या अखेरीस खरेदीच्या
<u>प्रस्तावांबाबत करावयाची कार्यवाही</u>

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.१०/२४/कोषा.प्रशा.५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १४ फेब्रुवारी, २०२४.

**संदर्भ** : शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२३/प्र.क्र.७/२३/कोषा. प्रशा-५,
दि.०९.०२.२०२३

<u>शासन परिपत्रक</u>

अर्थसंकल्प वितरण प्रणाली सुरु करताना विभागांनी रोख प्रवाह (Cash Flow) प्रमाणे दरमहा त्यांना उपलब्ध असलेल्या निधीचे नियोजन करुन वेळीच खर्च करावा असे अभिप्रेत होते. तथापि विभागांद्वारे अर्थसंकल्पीय वर्षाच्या शेवटच्या ३ महिन्यांमध्ये मोठया प्रमाणावर खर्च होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सबब अनावश्यक अथवा प्राधान्यक्रम नसणाऱ्या बाबींवरील खर्च निर्धारीत व नियमित करण्याच्या दृष्टीने करावयाची उपाययोजना म्हणून शासन असा निर्णय घेत आहे की, सर्व प्रशासकीय विभागांनी व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात दि. १५ फेब्रुवारी, २०२४ तसेच त्यानंतर कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना मंजूरी देऊ नये. त्याचप्रमाणे विद्यमान फर्निचरची दुरुस्ती, झेरॉक्स मशीन, संगणक, उपकरणे अथवा त्यांचे सुटे भाग यांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव, नैमित्तिक कार्यशाळा, सेमिनार व भाडयाने कार्यालय घेण्याचे प्रस्ताव इत्यादी बाबींच्या प्रस्तावांना मंजूरी देऊ नये. तसेच अशा प्रकारच्या खरेदीचे प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करु नयेत.

२. उपलब्ध निधीच्या मर्यादेमधील औषध खरेदीची बाब यास अपवाद राहील. केंद्रीय योजना व त्यास अनुरुप राज्य हिस्सा तसेच बाहय सहाय्यित प्रकल्पांतर्गत खरेदीच्या प्रस्तावांनादेखील सदर निर्बंध लागू होणार नाहीत.

३. जिल्हा वार्षिक योजना तसेच लोकप्रतिनिधी यांच्या स्थानिक विकास निधीमधून खरेदीबाबतचे प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करता येतील. त्यावर प्रकरणपरत्वे निर्णय घेण्याचे अधिकार वित्त विभागाचे राहतील.

४. दि.१५ फेब्रुवारी, २०२४ नंतर कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देता येणार नाही अथवा प्रशासकीय मान्यता प्राप्त असेल, तरीही निविदा प्रसिध्द करता येणार नाही. मात्र दि.१५ फेब्रुवारी, २०२४ पूर्वी निविदा प्रसिध्द झालेल्या प्रकरणी खरेदीची पुढील सर्व प्रक्रिया पूर्ण करता येतील.

५. चालू आर्थिक वर्षात कार्यालयाच्या दैनंदिन वापरातील उपभोग्य वस्तुंच्या मर्यादित खरेदीकरीता सदर निर्बंध लागू राहणार नाहीत. तथापि पुढील वर्षात आवश्यक असणाऱ्या वस्तुंची आगाऊ खरेदी करुन ठेवता येणार नाही.

६. सदर आदेश हे चालू आर्थिक वर्षाकरीता असून दि.१५ फेब्रुवारी, २०२४ ते दि.३१ मार्च,२० पर्यंत लागू राहतील.

७. सदर आदेश सर्व प्रशासकीय विभाग, त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालये, शासकीय महामंडळे, अनुदानित संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी/ ग्रामीण) इत्यादींबाबत शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून करावयाच्या खरेदीकरीता लागू राहतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२४०२१४११३६५६०००५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RUPALI KASHINATH SAWANT

Digitally signed by RUPALI KASHINATH SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=6c3a3903792b1204545e0d84bef8ba7fe114691fdf973fd9e12aa8c0b4498cab, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=97D8A8764FAC512B66CDC7CFC119E8EEE2E6B9474FAA85F5BDB3DBD4D88C763E, cn=RUPALI KASHINATH SAWANT
Date: 2024.02.14 11:46:54 +05'30'

(रुपाली सावंत)
**अवर सचिव, वित्त विभाग**

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
४. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
६. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
८. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
९. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१५. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१९. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२१. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली

२३. सर्व विभागीय आयुक्त
२४. सर्व जिल्हाधिकारी
२५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२६. संचालक , लेखा व कोषागारे, मुंबई
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२८. सहसंचालक,लेखा व कोषागारे,कोकण/पुणे/ नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/नागपूर
२९. संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई
३०. सहसंचालक,स्थानिक निधी लेखा मुंबई / पुणे/ नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/नागपूर
३१. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३२. निवड नस्ती कोषा प्र.५